**जाब देणार क्र. 1 ची साक्ष**

**<u>शपथेवर सुरु...</u>**

**<u>जाब देणार यांची शपथेवर उलटतपासणी – श्री. बाळू शिंदे वकील श्री. बी. आर. कावरे वकील यांच्याकरिता तक्रारदारातर्फे :</u>**

04. हे म्हणणे खरे आहे की, जाब देणार क्र. 2 टीमलिज हे 2012 ते सप्टेंबर 2017 या कालावधीमध्ये सामनेवाला क्र. 1 यांच्याक डे कंत्राटदार म्हणून काम पाहात होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार क्र. 1 हे सामनेवाला क्र. 2 यांच्याकडे काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार क्र. 1 यांनी 2016 साली डिमांड नोटीस सामनेवाला क्र. 1 व 2 यांना पाठवलेली होती. हे मला सांगता येणार नाही की, सदर डिमांड नोटीस 03/09/2016 रोजी पाठवलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर डिमांड नोटीसमध्ये तक्रारदार क्र. 1 यांची परमानंट करण्याची मागणी होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार व सामनेवाला यांच्यामध्ये समेट न झाल्यामुळे प्रस्तुतचा संदर्भ आयडीए न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. हे मला माहिती नाही की, आज रोजी सामनेवाला क्र. 1 कडे कोणते कंत्राटदार काम करत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सप्टेंबर 2017 पर्यंत तक्रारदार क्र. 1 सामनेवाला क्र. 2 यांच्याकडे कंत्राटी कामगार म्हणून कामाला होता. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार क्र. 1 यांना नंतर दुस–या कंत्राटदाराच्या रोलवर घेतलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार क्र. 1 यांना कामावर कायम ठेवायचे आहे किंवा नाही त्याबाबत न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, कराराचा कालावधी संपल्यामुळे संपुष्टात आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार क्र. 1 दि. 15/11/2023 पर्यंत सामनेवाला क्र. 1 कडे काम करत होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. 16/11/2023 रोजी तक्रारदार क्र. 1 यांना सामनेवाला क्र. 1 यांनी तोंडी आदेशाद्वारे (टर्मीनेशन) कामावरून काढून टाकलेले आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, तक्रारदार क्र. 1 हे आमचे कामगार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की,

2017 पर्यंत तक्रारदार क्र. 1 चे सामनेवाला क्र. 1 प्रिंसीपल एम्प्लॉयर होते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र. 1 हे 2017 पर्यंत प्रिंसीपल एम्पलॉयर होते त्यामुळे सर्व्हिस कंडीशन्स चेंज करण्यापुर्वी न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक होते. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, न्यायालयाची परवानगी घेण्याची आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाची परवानगी न घेतल्यामुळे सामनेवाला क्र. 1 यांनी बेकायदेशीरपणे टर्मीनेट केल्याची कारवाई केलेली आहे. हे मला माहिती नाही की, दि. 15/05/2024 ची नोटीस तक्रारदार क्र. 1 यांनी सामनेवाला क्र. 1 यांना पाठवलेली आहे. साक्षीदारास उलटतपासामध्ये नि. यु–4 वरील पान क्र. 169 ते 172 वरील नोटीस दाखवण्यात आली. सबब, त्यास **आर्टिकल ए** देण्यात येत आहे. हे मला माहिती नाही की, दि. 15/05/2024 रोजीची नोटीस सामनेवाला क्र. 1 यांना मिळाली होती.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.03.07 15:28:50 +0530

औरंगाबाद (डी. एस. खेडेकर)
दि. 06/03/2026 न्यायाधीश
कामगार न्यायालय–1, औरंगाबाद